महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# जाहीर सुचना

अधीक्षक अभियंता, महावितरण, मंडल कार्यालय, सोलापुर रोड, धाराशिव, या आस्थापनेवर सन २०२४-२५ करिता प्रशिक्षणासाठी शिकाऊ उमेदवारांच्या विजतंत्री -८० (A०४०८६९२), तारतंत्री-८० (A०४०८६९८) व संगणक चालक (Copa) (A०४०८७००) २० असे **एकुण १८०** जागा भरण्यासाठी विजतंत्री / तारतंत्री या व्यवसायात आय. टी. आय.(NCVT) उत्तीर्ण झालेल्या ( १०+२ या बंधामधील ) पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक पात्र उमेदवारांनी दिनांक १६.१२.२०२४ ते दिनांक २७.१२.२०२४ रात्री १२:०० वाजेपर्यंत www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर विभागनिहाय पुढील प्रमाणे ऑनलाईन अर्ज हे उमेदवारांना आवश्यक असलेल्या विभागानुसार करण्यात यावेत. **विभागनिहाय आस्थापना क्रमांक** :-१) धाराशिव विभागासाठी आस्थापना क्र. E09172700015 २) तुळजापुर विभागासाठी आस्थापना क्र. E01182700180. **एका उमेदवाराने एकाच विभागासाठी अर्ज करावा.** दिनांक २७.१२.२०२४ नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**टिप : अर्ज करावयाची शेवटची तारीख दिनांक २७.१२.२०२४ रोजी रात्री १२:०० पर्यंतची राहील.**

उमेदवाराने www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. **सदर भरती ही फक्त धाराशिव जिल्हयातील रहिवाशी असलेल्या उमेदवारांसाठी असून इतर जिल्हयातील उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.** ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी सर्व संबंधीत कागदपत्रांची (शैक्षणिक प्रमाणपत्र - आयटीआय गुणपत्रक व सनद, एसएससी सनद, जातीचा दाखला, आधारकार्ड, रहिवाशी दाखला, बँक पासबुक पहिल्या पानाची छायांकीत प्रत, ई.) साक्षांकीत छायांकित प्रत दिनांक २७.१२.२०२४ पर्यंत महावितरण मंडळ कार्यालय, धाराशिव, सोलापुर रोड, धाराशिव येथे प्रत्यक्ष सादर करावी. तसेच शैक्षणिक व इतर कागदपत्रांची साक्षांकीत केलेली छायांकित प्रत सादर न करणा-या उमेदवाराच्या ऑनलाईन अर्जाचा विचार केला जाणार नाही. भरती प्रक्रियेत आवश्यकता भासल्यास कोणताही बदल करण्याचे अथवा भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर रदद करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहतील. उमेदवाराने लोकप्रतिनीधी अथवा राजकिय व्यक्तिकडुन दबाव आणल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी रदद करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहतील. भरती प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या संपुर्ण प्रती मंडळ कार्यालय, धाराशिव येथे सादर कराव्यात अपुर्ण कागदपत्रे असलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी. उमेदवारांना सुचित करण्यात येते की, अधिकारी यांना भ्रमणध्वनी / दुरध्वनीद्वारे संपर्क करू नये. प्रशिक्षण कालावधी एक वर्षाचा राहील. निवड झालेल्या शिकाऊ उमेदवारास प्रशिक्षण कालावधीत नियमाप्रमाणे विद्यावेतन अदा करण्यात येईल,

**PRN No. 173 Dt. 11.12.2024**

**अधीक्षक अभियंता, महावितरण मंडल कार्यालय धाराशिव**